# भेंडी पिकावरील कीड व्यवस्थापनाबाबत सल्ला

शेतकरी बंधूंनो  बऱ्याच भेंडीच्या शेतात तपकिरी पांढऱ्या रंगाची अळी शेंड्यावर व  तसेच फळे तयार होताना फळात शिरुन त्यावर उपजीविका करताना आढळून येत आहे  या किडीचा प्रादुर्भाव  लक्षात घेऊन सुरुवातीला एकटी दुकटी दिसणारी कीडग्रस्त भेंडी  तोडून अळी सहित नष्ट करावी सुरुवातीला शेंडे व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसतात पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी व रासायनिक कीटकनाशकाचा वापर आर्थिक नुकसानीची पातळी लक्षात घेऊन गरजेनुसार  Chlorantraniprole 18.5.SC 2.5 मिली किंवा Lambda cylohathrine 5 EC 8 ते 10 मिली  यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची दहा लिटर पाणी या प्रमाणात घेऊन  फवारणी करावी .

भेंडी पिकात मावा तुडतुडे व फुलकिडे यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या बाहेर आढळल्यास इमिडाक्लोप्रिड 70 डब्ल्यू जी 0.7 ग्रॅम अधिक दहा लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आवश्यकतेनुसार फवारणी करावी. भेंडी पिकात पांढऱ्या माशी चे पिल्ले व प्रौढ पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पाणी पिवळी पडतात त्याकरता सर्वप्रथम भेंडी शेतात पिकाच्या समकक्ष उंचीवर हेक्टरी दहा ते बारा पिवळे चिकट सापळे लावा व पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या बाहेर आढळल्यास थायमेथोक्ससोम 25% डब्ल्यू जी दोन ग्रॅम अधिक दहा लिटर पाणी या प्रमाणात घेऊन

आवश्यकतेनुसार फवारणी करा  कृपया फवारणी करताना लेबल क्लेनम  . शिफारशीप्रमाणेच करा व अनेक रसायनांचे मिश्रण टाळा तसेच फवारणी करताना सुरक्षा किट चा वापर करा तसेच शासनाने यापूर्वी कोविंड संदर्भात दिलेल्या सर्व संदेशाचे सूचना चे व आदेशाचे पालन करून सुरक्षित रहा धन्यवाद

- **राजेश डवरे कीटकशास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम** .